साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

# विपस्सना

साधक (मराठी)

**बुद्धवर्ष 2568, श्रावण पौर्णिमा, 19 ऑगस्ट, 2024 वर्ष 8 अंक 5**

**वार्षिक शुल्क** रु. 100/- मात्र (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50)

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

**धम्मवाणी**

**जातिधम्मो जराधम्मो, ब्याधिधम्मो सहं तदा।**
**अजरं अमतं खेमं परियेसिस्सामि निब्बुतिं॥**

*—बुद्धवंसपाळि - 2/7*

– हे जे जातिधर्मा, जराधर्मा आणि व्याधीधर्मा आहे, त्यातून निवृत्त होऊन जे अजर, अमर आणि क्षेमपूर्व आहे, मी त्याच्या शोधात पडेन.

## चालला त्यागून राज्य-सुख!

पुक्कुसाति (भाग 2) *(मागील अंकावरून पुढे....)*

बिंबीसारने हे पत्र रत्न-जडित स्वर्णपेटीत ठेवून त्याला एकावर एक अशा दहा बहुमूल्य पेट्यांमध्ये बंद केले आणि लाख लावून राज्यमोहरेने सीलबंद केले. मग त्याला मौल्यवान वस्त्रांमध्ये बांधून सुसज्जित मंगलमयी हत्तीच्या पाठीवर स्थापित केले आणि राजकीय श्वेतछत्राने आच्छादित करून एका श्वेतकेतु सैनिकांच्या तुकड़ीसहित वाजत-गाजत तक्षशिलेच्या यात्रेसाठी रवाना केले..

रस्त्यावर सडा शिंपडून वाळू पसरवण्यात आली. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मांगल्याच्या तोरणमाळा लागल्या तसेच स्वच्छ पाणी भरलेले कलश ठेवले गेले आणि आपल्या नगराच्या सीमेपर्यंत बिंबीसार स्वत: त्यांच्याबरोबर पायी चालत गेला. पुढील यात्रेसाठी संदेश-वाहकांना आदेश दिला की धर्मरत्नाची ही अनमोल भेट तक्षशिलेपर्यंत अत्यंत सन्मानपूर्वक नेण्यात यावी आणि तिथे पोहोचल्यावर माझ्या मित्राला माझ्याकडून हा संदेश देण्यात यावा की याला एखाद्या एकांत स्थळी आदरपूर्वक उघडून पहावे.

पुक्कुसातिने आपला उपहार जनतेसमोर उघडण्याचा संदेश पाठवला होता की ज्यामुळे जनतेवर दोन्ही राजांच्या मित्रत्वाची खोलवर छाप पड़ेल. बिंबीसारने आपली भेट एकांतात उघडण्याचा संदेश पाठवला आहे. बिंबीसार हे जाणतो की पुक्कुसातिजवळ पूर्वजन्मांची पुण्य-पारमी असेल तर धर्माचा हा संदेश वाचून तो राज्य त्यागण्याचा विचार करेल आणि अशा अवस्थेत परिवार आणि राज्यशासन व नगरातील इतर उपस्थित लोक त्याच्या उत्साहाला शिथिल करण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळे त्याच्यासाठी एकांतच कल्याणकारी होईल.

हजारो मैल दूरची यात्रा पूर्ण करत हा शाही कारवा (समूह) जेव्हा गांधारनरेशच्या सीमेवर पोहोचला तेव्हा पुक्कुसातिने आपल्या अमात्यांना पाठवून या राज्य-उपहाराचे यथायोग्य स्वागत केले आणि तक्षशिलेपर्यंतची यात्रा मोठ्या धूमधडाक्याने सन्मानपूर्वक पूर्ण केली. राजनगरी तक्षशिलेच्या सीमेवर स्वागतासाठी पुक्कुसाति स्वत: पोहोचला आणि मिरवणुकीसोबत राजमहालापर्यंत पायी चालत आला.

मित्र बिंबीसारच्या सूचनेनुसार त्याने ही अनमोल पेटी राजमहालाच्या एकांत कक्षात पोहोचवली आणि दारावर एका पहारेकऱ्याला बसवले. एकांतात जाऊन त्याने स्वत: आपल्या हातांनी उपहाराची पेटी उघडली. लाखेची राज्यमोहोर तोडून पेटीतून पेटी काढत शेवटी रत्नखचित स्वर्ण-पेटी काढली आणि ती उघडून गोल गुंडाळलेल्या लांब स्वर्ण-पत्राला अत्यंत आदरपूर्वक बाहेर काढले.

"माझ्या मित्राने माझ्यासाठी धर्माचा हा अनमोल उपहार पाठवला आहे जो मध्यदेशासारख्या पावन भूमीतच उपजतो. इथे मिळणे अशक्य आहे". तेव्हा अत्यंत श्रद्धापूर्वक अंत:करणाने स्वर्णपत्र उघडून वाचू लागला. पाहू, माझ्या मित्राचा काय धर्म-संदेश आहे?

पहिलीच ओळ होती - *इध तथागतो लोके उप्पन्नो।*

इथे लोकात तथागत उत्पन्न झाले आहेत.

काय खरोखर संसारात तथागत बुद्ध उत्पन्न झाले आहेत! काय खरोखर मी बुद्धकाळात जन्मलो आहे! या नुसत्या चिंतनानेच त्याच्या मनात प्रसन्नतेचा एक प्रबळ प्रवाह वाहू लागला. आणि मग जेव्हा पुढे,

"इतिपि सो भगवा......आदि" या शब्दांमध्ये भगवानांच्या गुणांचे वाचन केले तेव्हा वाचता-वाचता शरीराच्या अकरा हजार रोमांच-पेशी उत्तेजित झाल्या. सारे मानस पुलकित झाले, सारे शरीर रोमांचित झाले. काही वेळ तो याच प्रसन्न-विभोर अवस्थेत भान हरपून बसला. ही देखील शुद्ध राहिली नाही की मी बसलो आहे की उभा आहे. पुढच्या ओळी तो वाचूच शकला नाही. अशा भावविभोर अवस्थेत बराच वेळ गेल्यावर जेव्हा भावावेश थोडा कमी झाला तेव्हा त्याने पुढे वाचणे सुरु केले. पुढे शुद्ध धर्माच्या गुणांची व्याख्या होती.

"स्वाक्खातो भगवता धम्मो..... इत्यादि" वाचता-वाचता पुन्हा तन-मन तशाच प्रकारे पुलकित-रोमांचित होऊन गेले. पुन्हा तीव्र भावावेश जागला. पुन्हा काही वेळ भान हरपून बसला. काही वेळानंतर मन शांत झाले तेव्हा पुढे संघाच्या गुणांच्या ओळी वाचल्या.

"सुप्पटिपन्नो भगवतो सावकसङ्घो... इत्यादि" पुन्हा तीच दशा झाली. त्यानंतर पत्राचा चतुर्थ भाग वाचू लागला तेव्हा त्यात आनापान साधनेचे विवरण होते, जे वाचता-वाचता मनात आणि शरीरात आनंदाच्या अशा धाराप्रवाहाची अनुभूती होऊ लागली की सहजच चित्त एकाग्र झाले, समाधिस्थ झाले. अनेक जन्मांच्या पुण्य-पारमितांचा संग्रह होता त्यामुळे चित्त तत्काळ प्रथम ध्यान समापत्तीत समाधिस्थ होऊन अल्पकाळातच प्रथमहून द्वितीय, द्वितीयहून तृतीय आणि तृतीयहून चतुर्थ ध्यान समापत्तीत गंभीरतापूर्वक समाधिस्थ झाले. बाहेरच्या आलंबनांचे जरादेखील भान राहिले नाही. ही अवस्था बराच वेळ राहिली. जरी अजून विपश्यनेच्या उच्च अवस्था प्राप्त झाला नव्हत्या परंतु तरीही चौथ्या ध्यान-समापत्तीचा धर्म-रसच इतका अपूर्व होता की वारंवार तो त्याच

अभ्यासात लीन होऊ लागला आणि याच्या रसास्वादनात त्याने दोन आठवडे घालवले.

कक्षाच्या द्वारावर पहारेकरी बसला होता. केवळ एका व्यक्तिगत सहायकाच्या अतिरिक्त इतर कोणालाही प्रवेश निषिद्ध होता. 15 दिवसांपर्यंत देशाचा राजा ना राजमहालाच्या राणी-निवासात गेला ना राजदरबारात, ना न्यायालयात आणि ना सेनालयात. राज्याच्या प्रमुख लोकांना चिंता वाटू लागली की आमच्या राजाला असा कोणता उपहार मिळाला आहे की ज्याच्याने तो अशा प्रकारे वशीभूत झाला आहे?

चतुर्थ-ध्यान समापत्तीच्या शांती-रसाच्या स्वानुभूतीने प्रभावित झालेल्या राजा पुक्कुसातिला आपल्या मित्राचे अंतिम शब्द आठवले. खरोखर मला राज्य त्यागून त्वरीत अभिनिष्क्रमण केले पाहिजे. माझे सौभाग्य आहे की या वेळी देशात बुद्ध उत्पन्न झाले आहेत. त्यांच्या सानिध्यात राहून भवभ्रमणाच्या दु:खातून पूर्णपणे विमुक्त करणारी विपश्यना विद्या शिकून मला आपले मनुष्य जीवन सार्थक करून घेतले पाहिजे. न जाणे जीवन थोडेच शिल्लक राहिले असेल. महान उपकार आहेत माझ्या मित्राचे ज्याने मला असा कल्याणकारी संदेश पाठवला.

अशा प्रकारे जीवनमुक्त अर्हंत होण्याच्या उद्देशाने भगवान बुद्धांनी सांगितलेल्या मार्गावर चालण्यासाठी त्याने राजपाट, घरदार त्यागण्याचा दृढ़ निश्चय केला. आपल्याच हातांनी कृपाण घेऊन मस्तकावरचे आणि दाढी-मिशीचे केस कापले आणि सहायकाकडून दोन काषाय वस्त्रे मागवली. एकाला अधोवस्त्र बनवून घातले आणि दुसऱ्याला ऊर्ध्ववस्त्र बनवून अंगावर पांघरले. मातीचे एक भिक्षा-पात्र आणि लाकडाचा एक दंडही मागवला आणि हे सर्व हातात घेऊन तो महालातून खाली उतरला.

राजपरिवारातील लोक त्याला या वेशात ओळखू शकले नाहीत. त्यांना वाटले की कोणी संन्यासी राजाला भेटायला आला असेल आणि आता परत चालला असेल. राजदरबारातील राजपुरुषही त्याला ओळखू शकले नाहीत. परंतु जेव्हा निजी सहायकाने सर्व परिस्थिती स्पष्ट केली तेव्हा राणी-निवास आणि दरबारात हाहा:कार उडाला. आगीच्या वणव्यासारखी ही बातमी साऱ्या नगरात पसरली. पुक्कुसातिसारख्या प्रजावत्सल राजाच्या राज्यत्यागाच्या बातमीने साऱ्या प्रजेला दु:खसागरात लोटले. प्रजेवर अनभ्र वज्रपात झाला. शोक-मग्न होऊन रडत-ओरडत नगरनिवासी, राज्याचे शासनाधिकारी आणि राजपरिवारातील लोक भिक्षू वेशधारी पुक्कुसातिच्या मागे गेले. लोकांनी आक्रोश करत म्हटले "महाराज, आपल्याशिवाय आम्ही अनाथ होऊन जाऊ."

पुक्कुसातिने सांत्वनेच्या शब्दांत म्हटले "इथे अनेक योग्य व्यक्ती आहेत जे माझ्या अनुपस्थितीत राज्य-प्रशासनाचे दायित्व अत्यंत कुशलतापूर्वक निभावतील."

मंत्र्यांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला की, "महाराज, मध्यदेशाचे राजे खूप मायावी असतात. कुटिल असतात. त्यांची कूटनीती, छल-कपटाने परिपूर्ण असते. कोण जाणे लोकात सम्यक संबुद्ध उत्पन्न झाले आहेत किंवा नाही? होऊ शकते की ही सर्व प्रवंचना असावी. आपल्याला राज्यच्युत करवून गंधार देशाला दुर्बल बनवू इच्छित असतील जेणेकरून वेळ येताच त्याला हडप करता येईल."

"नाही, मंत्रीगणहो, माझ्या परम मित्राप्रति अशा शंका-कुशंका घेऊ नका. मगधचे राज्य गंधार देशापासून खूप दूर आहे. यामध्ये कौशल, कौशाम्बी, चेदिय, पांचाल, कुरु यासारखी शक्ती-संपन्न जनपदे आहेत. त्यांचे अतिक्रमण करून गंधार देशावर कब्जा करणे अशक्य आहे. हा न पाहिलेला मित्र, माझा परम हितैषी आहे. तो जाणतो की भगवान मगध देशात विहार करत आहेत. त्यामुळे तो स्वत: गृहस्थ असूनही त्यांच्या सानिध्याचा दीर्घकाळ लाभ घेऊ शकतो. परंतु भगवान मध्यदेश सोडून इतक्या दूर विहार करण्यासाठी येणार नाहीत. त्यामुळे त्यांच्या सानिध्यापासून मी वंचित राहू नये याकरीता त्याने मला गृह-त्याग करून त्यांच्याजवळ राहण्यासाठी प्रोत्साहित केले आहे. मंत्रीगणहो, माझ्या मित्राप्रति मिथ्या संदेह करून दोषाचे भागी बनू नका. तो माझे कल्याण चिंतणारा सन्मित्र आहे."

"बुद्धुप्पादो दुल्लभो लोकस्मिं" राज-अमात्यांनो, संसारात बुद्धांचे उत्पन्न होणे खरोखरच दुर्लभ आहे. माझ्या आणि माझ्यासारख्या अनेकांच्या सौभाग्याने ही दुर्लभता सुलभ झाली आहे. मला त्यांच्या शरणात जाऊद्या! अनेक जन्मांमध्ये मुक्तीच्या शोधात मी व्यर्थ भटकलो आहे. आता याला प्राप्त करण्याचा सुअवसर आला आहे. मला या लाभापासून वंचित करण्याचा वृथा प्रयत्न करू नका."

असे अनेक प्रकारे समजावल्यानंतरही लोकांनी ऐकले नाही. रडत, आक्रोश करत त्याच्या मागे मागे चालतच राहिले. तेव्हा पुक्कुसातिने दृढ़तेचे पाऊल उचलले. त्याने आपल्या लाकडी दंडाने रस्त्यावर एक रेष ओढली आणि म्हटले - "मी गृही जीवनाचा त्याग केला आहे परंतु अजूनही जर तुम्ही मला आपला राजा मानत असाल तर मग ऐका, ही राजाज्ञा आहे- कोणी या सीमेचे उल्लंघन करू नये."

लोक राजा पुक्कुसातिच्या या दृढ़ निश्चयाला पाहून हताश झाले आणि राजाज्ञेला नमस्कार करून, रडत-ओरडत नगराकडे परतले. गृहत्यागी श्रमण पुक्कुसाति गंधारहून मगधकडे जाणाऱ्या महापथावर पायी चालू लागला.

तक्षशिलेहून राजगृहचा रस्ता खूप लांब होता. पण भूतपूर्व गंधार नरेश आता एका सामान्य भिक्षूच्या रूपात सुदृढ़ निश्चयाने आणि सबळ पावलांनी चालत जात होता. "भगवान बुद्ध, आपल्या हातांनी आपले केस कापून, काषाय वस्त्र धारण करून निघाले तेव्हा एकटेच सत्यान्वेषणाच्या चारिकेवर निघाले होते. मला त्यांच्याच चरण-चिन्हांवर चालायचे आहे. मी देखील एकटाच विचरण करेन. त्यांनी पायात पादत्राणेही घातली नव्हती. मीही अनवाणीच यात्रा करेन. त्यांनी कोणत्या वाहनाचा उपयोग केला नव्हता. मीही कोणत्या वाहनाचा वापर करणार नाही. त्यांनी डोक्यावर पानांच्या छत्रीचाही उपयोग केला नव्हता. मीही डोके उघडे ठेवून यात्रा करेन. त्यांनी न मागता जे मिळेल त्याच्याने यात्रा केली होती. मीही अदिन्नादानापासून विरत राहून यात्रा करेन. दात घासण्यासाठी एखाद्या झाडाची फांदीही मी स्वत: तोडणार नाही. तोंड धुण्यासाठी एखाद्या जलाशयाचे पाणीही मी स्वत: ग्रहण करणार नाही. कोणी दिले नाही तर भोजनही ग्रहण करणार नाही."

या दृढ़ व्रतांचा अतूट संकल्प धारण करून भिक्षू पुक्कुसाति एक एक पाऊल पुढे चालू लागला. तक्षशिलेहून राजगृहची यात्रा केवळ लांबच नाही तर दुर्गमही आहे. राजमहालांच्या सुख-सुविधेत आणि वैभव-विलासात जन्मलेला, वाढलेला पुक्कुसाति ओबडधोबड, कडक धरतीवर अनवाणी पावलांनी चालला आहे. पायाला फोड आले आहेत. चालता चालता फोड फुटत आहेत. जखमांमध्ये पू झाला आहे, तो वाहत आहे. पायी चालण्याचे श्रम तर आहेतच, या फोडांची आणि जखमांची पीड़ाही कमी तीव्र नाही.

पुढे व्यापाऱ्यांचा एक काफिला चालला आहे. त्यांच्या मागे-मागे पुक्कुसाति दृढ़ पावलांनी पायी चालत आहे. समोर चाललेल्या शेकडो बैलगाड्यांवर खरेदी-विक्रीचे सामान लादले आहे. त्याचबरोबर काही एक आलीशान रथासारख्या बैलगाड्या चालल्या आहेत, ज्या काफिल्याच्या मालक सावकारांना झोपण्या-बसण्यासाठी आणि आराम करण्यासाठी आहेत. यात झालरवाल्या आरामदेही जाड गाद्या, उशा आणि पाठीसाठी तक्के ठेवले आहेत. एकेका गाड़ीला दोन-दोन श्वेतवर्णी, स्थूल पोटाचे, मोठे बैल ओढत आहेत. त्यांच्या पोटाचा घेर धरतीला स्पर्श करत आहे असे वाटते. मोठ-मोठी शिंगे असणारे सुंदर चेहरे आहेत यांचे. शिंगांना नयनरम्य रंगांनी रंगवले आहे. गळ्यात एक-एक घंटी बांधली आहे. प्रत्येक बैलाच्या पाठीवर सुंदर नक्षीकाम केलेली रंगी-बेरंगी झूल घातली आहे, जिच्यावर छोट्या-छोट्या घंट्यांची झालर झुलत आहे. गाड़ीच्या चाकांच्या आऱ्यांवर घुंघरे बांधली आहेत. प्रत्येक रथाला जोडलेले दोन्ही बैल एकाच वेळी आपले डोके हलवत-डोलवत गाड़ी खेचतात तेव्हा या घंट्यांचा, घुंगरांचा एकत्रच मंजूळ स्वर-निनाद होत आहे. हा रुणझुण स्वर खूप चित्ताकर्षक आहे. परंतु मागे-मागे चालत असलेल्या भिक्षूचे याकडे लक्ष जात नाही. तो नजर खाली झुकवून आपली श्रमसाध्य यात्रा पायी चालून पूर्ण करीत आहे.

सूर्यास्त झाल्यावर काफिला एका ठिकाणी थांबतो. मालकांकरीता सुंदर आरामदेही आणि इतरांसाठी साधारण तंबू लावले जातात, ज्यात ते रात्री विश्राम करतात. भिक्षू त्यांच्याजवळही जात नाही. थोड्या दूर अंतरावर एका झाडाखाली मांडी घालून बसतो. ना घावांनी भरलेले पाय धुण्यासाठी पाणी आहे ना दुखणारी पाठ चोळण्याचे काही साधन आहे. तो आनापानचे ध्यान करत लगेचच

उपचारहून अर्पणा समाधीकडे जात पहिल्या ध्यानापासून चौथ्या ध्यानाच्या समापत्तीत समाहित होऊन जातो. रात्रभर ध्यानात लीन राहून शरीराचे सारे दुखणे, थकवा दूर करतो. दुसऱ्या दिवशी ताजातवाना होऊन पुन्हा यात्रेसाठी तयार होतो.

काफिल्याचे लोक सकाळचा नाश्ता करून शिल्लक राहिलेले तसेच काही उष्टे अन्न भिक्षूच्या भिक्षापात्रात टाकतात. भोजन कधी अर्धेकच्चे असते, कधी जास्त शिजलेले. कधी कोरडे असते, कधी ओले. कधी आळणी असते, कधी खारट. गृहत्यागी राजसी भिक्षूच्या भिक्षापात्रात जे पडेल त्यालाच अमृतासमान स्वादिष्ट मानून तो सहर्ष ग्रहण करतो आणि त्या एका वेळच्या आहारानेच दिवसभराची यात्रा करतो.

काफिल्याच्या श्रेष्ठींना जर माहित असते की हा जो फाटका भिखारी मागे-मागे चालत आहे तो स्वत: गांधारनरेश पुक्कुसाति आहे, ज्याच्या कृपेने आपल्याला तक्षशिलेत आयातकराची सूट मिळाली आणि आपला नफा कित्येक पटींनी वाढला तर श्रद्धा और कृतज्ञतेने विभोर होऊन त्याच्यासाठी यात्रेच्या त्या सर्व सुविधा त्यांनी केल्या असत्या की ज्या त्यांनी स्वत:साठी केल्या होत्या. पुक्कुसातिला हे अपेक्षित नव्हते. त्याला एका श्रमणाचे श्रमसाध्य जीवन श्रेष्ठतर दिसत होते. या कष्टात त्याला अतीव मानसिक संतुष्टता आणि प्रसन्नता मिळत होती. याच प्रसन्नतेत त्याने सुमारे 192 योजने (2,457.6 किमी.) दूर असलेली लांबची यात्रा पूर्ण केली.

रस्त्यात काफिला श्रावस्ती नगरातून गेला. नगराच्या बाहेर पडल्यावर जेतवन विहाराच्या समोरून गेला. पुक्कुसातिने ऐकले हा बुद्धांचा विहार आहे. त्याने विचार केला अनेक लोक बुद्ध असल्याचा दावा करतात. मला त्यांच्याशी काही देणे-घेणे नाही. माझ्या कल्याणमित्राने बिंबीसारने ज्या भगवान गौतमबुद्धांविषयी लिहिले आहे, माझ्यासाठी तर तेच बुद्ध आहेत आणि ते तर मगधदेशीय राजनगरी राजगृहमध्ये भेटतील. याच विचाराने उत्साहित होऊन, त्याने श्रावस्तीपासून राजगृहची 45 योजने (576 किमी.) दूर असलेली यात्रा पूर्ण केली.

तो जेव्हा राजगृहला पोहोचला तेव्हा सूर्य मावळला होता आणि राज्याच्या कठोर नियमानुसार नगराची द्वारे बंद करण्यात आली होती. ती प्रात:काळापूर्वी कोणासाठीही उघडू शकत नव्हती. त्यामुळे त्याने राजनगराच्या बाहेर विश्राम करण्याचे ठरवले. तिथे हा समाचार मिळाला की ज्या भगवान सम्यक संबुद्धांना भेटायला तो इथे आला आहे ते यावेळी श्रावस्तीच्या जेतवनात विहार करीत आहेत. तेव्हा त्याने ठरवले की आता एक रात्र इथे घालवून उद्या भगवानांच्या दर्शनासाठी पुन्हा यात्रेवर निघेन.

*– वर्ष 20, बुद्धवर्ष 2534, वैशाख पौर्णिमा, दि. 28-05-1991, अंक 12*

------0------

## मंगल मृत्यु

- गांधीनगर (गुजरात) च्या वरिष्ठ स आचार्या श्रीमती विशाखा संघदीप यांचे शरीर दिनांक 19/6/ 2024 ला शांतीपूर्वक शांत झाले. 1995 मध्ये पूज्य गुरुजींनी त्यांना सहाय्यक आचार्य म्हणून नियुक्त केले आणि 2013 मध्ये वरिष्ठ स. आ. तेव्हापासून त्यांनी नियमितपणे आपले पती श्री जयपाल यांच्यासोबत अनेक शिबिरांमध्ये सेवा देऊन आपले जीवन धन्य केले. त्या धर्मपथावर उत्तरोत्तर प्रगती करून निर्वाणलाभी होवोत ,धर्म परिवाराची हीच मंगल कामना आहे.
- मुजफ्फरपुरच्या श्री भरत प्रसाद मिश्रांचे शरीर 26 जुलै 2024 ला शांतीपूर्वक शांत झाले. 2012 मध्ये स.आ आणि 2018 मध्ये वरिष्ठ स.आ. म्हणून नियुक्त झाले आणि मुजफ्फरपुर आणि जवळच्या अनेक केंद्रांवर धर्मसेवा/शिबिरांचे संचालन करून धन्य झाले.त्यांची धर्मपथावर उत्तरोत्तर प्रगती होवो व ते निर्वाण लाभी होवोत, धर्म परिवाराची हीच मंगल कामना आहे.
- डॉक्टर सीमा प्रधान बेंगलोर मधून 2011 ला सहायक आचार्य म्हणून नियुक्त झाल्या. त्यांनी 3 ऑगस्ट 2024 च्या रात्री आपल्या राहत्या घरी हृदयाघातामुळे शांतीपूर्वक शरीर त्यागले. त्यांनी लहान मुलांच्या तसेच किशोरांच्या शिबिरामध्ये खूप मनःपूर्वक सेवा दिली. त्या विपश्यना विशोधन विन्यासच्या रिसर्च टीमच्या सदस्य होत्या. त्यांनी स्वतःही विपश्यनेवर अनुसंधान केले आणि अनेक अनुसंधान करणाऱ्यांना मार्गदर्शन सुद्धा केले. धर्मपथावर उत्तरोत्तर प्रगती होत त्या निर्वाणलाभी होवोत , धर्म परिवाराची हीच मंगल कामना आहे.

----------0----------

## ऑनलाइन भावी शिबिर कार्यक्रम व आवेदन

सर्व भावी शिबिरांची माहिती नेटवर खालील लिंक्स वर उपलब्ध आहे. सर्व प्रकारचे बुकिंग केवळ ऑनलाईन होत आहे. म्हणून आपल्याला निवेदन आहे की खालील लिंक वर चेक करा आणि आपल्याला उपयुक्त शिबिरासाठी अथवा सेवेसाठी सरळ ऑनलाईनच आवेदन करावे. *https://schedule.vridhamma.org* व *www.dhamma.org*

विश्वभरातील सर्व भावी शिबिरांची माहिती व आवेदनासाठी: *https://schedule.vridhamma.org* व *www.dhamma.org*, व खालील लिंक पहावी www.hindi.dhamma.org

-----00-----

## अति महत्वपूर्ण सूचना

1. सेंट्रल आईवीआर (इंटरैक्टिव्ह वॉयस रिस्पॉन्स) संभाषण नंबर- ०२२-५०५०५०५१ अर्जदार या नंबरवर आपल्या नोंदवलेल्या मोबाईल नंबर (फॉर्म मधील उल्लेखित नंबर) ने आपली शिबिर नोंदणीची स्थिति तपासण्यासाठी, रद्द करण्यासाठी, स्थानांतरीत करण्यासाठी अथवा कुठल्याही सेंटरवर नोंदणी केलेल्या आपल्या अर्जाची पुष्टी करण्यासाठी कॉल करू शकतात. ते या सिस्टीमद्वारे केंद्राशी सुद्धा संपर्क करू शकतात. हा भारताच्या सगळ्या विपश्यना केंद्रांसाठी एक केंद्रीय संपर्क नंबर आहे.

2. जर अकेंद्रीय (नॉन-सेंटर) भावी शिबिरांचे कार्यक्रम पत्रिकेत प्रकाशन करण्यासाठी पाठवू इच्छिता, तर कृपया त्यांनी आपल्या समन्वयक क्षेत्रिय आचार्य (सीएटी) यांच्या सहमती पत्राबरोबर पाठवावे, जेव्हा की स्थापित केंद्राचे कार्यक्रम केंद्रीय आचार्य (सीटी) यांच्या सहमती पत्राबरोबर आले पाहिजेत. याशिवाय आम्ही कोणतेही कार्यक्रम पत्रिकेत प्रकाशित करू शकत नाही.

-----0-----

### अतिरिक्त उत्तरदायित्व

1. श्रीमती एम. आर. राजेस्वरी, धम्म उत्कल, उड़ीसा के केंद्र-आचार्य की सहायता

### नव नियुक्तियां
### सहायक आचार्य

1. श्री सुभाष द्विवेदी, ठाणे
2. श्रीमती मिशेल माइकल, ईगतपुरी
3. श्री विकास मस्के, बीड
4. श्रीमती अंबिका मार्डिकर, अमरावती
5. श्रीमती ज्योती वानखड़े, अकोला
6. श्रीमती ज्योती पांवणी, अहमदाबाद
7. श्री ब्रह्मपाल चौरे, भंडारा
8. श्रीमती स्मिता टेम्पे, नागपुर
9. श्री गंगाराम प्रजापति, रायपुर
10. श्री दिलीप कुमार यॉनजों, दार्जिलिंग, वेस्ट बंगाल
11. 11. Mrs. Thitirat Wangratanaparkdee, Thailand

### बालशिबिर शिक्षक

1. श्रीमती दयाबेन वीराभाई हादिया, महुवा
2. कु. अनामिका रमेशभाई सागर, वडोदरा
3. श्रीमती हीना पटेल, बड़ौदा
4. श्री जीत सिंह, गाजियाबाद
5. कु. देपानी रीता, बड़ौदा
6. श्री नीलेश मारुति पोवार, कोल्हापुर
7. श्री संतोष दत्तात्रेय टोट्रे, पनवेल
8. श्रीमती सरला देवी कुशवाहा, वडोदरा
9. श्री सत्येंद्र सिंह कुशवाहा, वडोदरा
10. श्री विजयभाई प्रतापभाई डोडिया, महुवा
11. श्रीमती तृप्ति जायसवाल, इंदौर
12. Mr Niko Meinhold, Germany
13. Mrs Herta Kraemer, Germany
14. Mr Nikita Pankov, Russia
15. Mr Maxim Sergeenkova, Russia
16. Mrs Guzel Sergeenkova, Russia
17. Mr Mikhail Gerasimovich, Russia
18. Mrs Esmira Jafarova, Russia
19. Ms Nadine Veldhuis, Netherlands
20. Mr Joost Walda, Netherlands
21. Mrs Lotte Stekelenberg, Netherlands
22. Mrs Timu Georgeta, Romania
23. Mr Andrea Fattoretti, Italy
24. Ms Innocenza Sorbi, Italy
25. Mrs Sara La Rosa, Italy
26. Ms Solimar Belandria, Italy
27. Mr Arthur Wolstenholme, UK
28. Mr Lisle Turner, UK
29. Mr Brendan Moher, Ireland
30. Ms Linda Meuwissen, Switzerland
31. Ms Susanti Chandra, Switzerland
32. Ms Katina Avramova, Bulgaria
33. Ms Yana Ovchelarova, Bulgaria
34. Ms Limor Ronen Cohen, Israel
35. Ms Linnea Osterberg, Sweden
36. Mrs Tiske Bosserez, Belgium
37. Mr Torben Rosgaard, Belgium
38. Mr Benoit Braida, France
39. Ms. Savry Rath, Cambodia
40. Ms. Sokhuom Vun, Cambodia
41. Mr Chantheborras Chea, Cambodia

### क्षेत्रीय संयोजक बाल-शिबिर

कु. रोली बाजपेयी - क्षेत्रीय संयोजक बाल शिबिर - बिहार

## ग्लोबल विपश्यना पगोडा, गोराई, मुंबईमध्ये

### 1. एक दिवसीय महाशिबिर (Mega Course) कार्यक्रमः

**रविवार 29** सप्टेंबर, भाद्रपद-पौर्णिमा व पूज्य गुरुजींच्या पुण्य-तिथि निमित्ताने
**रविवार 19** जानेवारी 2025 सयाजी ऊ बा खिन व माताजींच्या पुण्य-तिथि निमित्ताने **एक दिवसीय** महाशिबिर होतील.

**Email:** *oneday@globalpagoda.org* **Online registration:** *http://oneday.globalpagoda.org/register*

### 2. एक दिवसीय शिबिर दररोज

या व्यतिरिक्त विपश्यना साधकांसाठी पगोडा मध्ये दररोज एक दिवसीय शिबिर आयोजित केली जात आहे. कृपया सामील होण्यासाठी खालील लिंक चा उपयोग करावा. आणि एक मोठ्या सामूहिक तप-सुखाचा लाभ घ्यावा. *समग्गानं तपोसुखो।* **संपर्कः 022 50427500 (Board Lines)** - Extn. no. 9, मो. **+91 8291894644.** (प्रतिदिन 11 से 5 बजे तक)

Online registration: http://oneday.globalpagoda.org/register; **Email:- guruji.centenary@globalpagoda.org or** Email: oneday@globalpagoda.org

### 'धम्मालय' विश्राम गृह

एक दिवसीय महाशिबिरासाठी आल्यावर रात्री **'धम्मालय'** मध्ये विश्रातीसाठी सुविधा उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी आणि (बुकिंग) नोंदणीसाठी **संपर्कः** 022 50427599 or email- *info.dhammalaya@globalpagoda.org or info@globalpagoda.org*

## मोबाईल ॲप मध्ये नवीन सुधारणा

विपश्यना विशोधन विन्यासाने आपल्या मोबाईल ॲपमध्ये एक नवीन सुधारणा केली आहे, ज्यामुळे आपण भविष्यातील शिबिरांमध्ये भाग घेण्यासाठी सरळ ॲप द्वारेच आवेदन करू शकता. जसे -

**दहा दिवसीय शिबिर, दहा दिवसीय एक्झिक्यूटिव्ह शिबिर,**
**लहान मुलांचे शिबिर, तीन दिवसीय शिबिर इत्यादी**

भारतातील सर्व केंद्र, तसेच दक्षिण आफ्रिका, केनिया, इंडोनेशिया, संयुक्त अरब अमिरात इत्यादी देशांत कुठेही. एकदा आपण आवेदन केल्यावर त्याच ॲप मध्ये आपण आपल्याविषयी होणाऱ्या सर्व गतीविधींची माहिती प्राप्त करू शकता.

आपल्याला वाटले तर आपण आपल्या शिबिरांची नोंदही ठेवू शकता.

सध्या हे नवीन फीचर्स फक्त अँड्रॉइड फोनसाठी उपलब्ध आहेत आणि लवकरच ते आईओएस (आय फोन) साठी उपलब्ध केले जातील.

डाऊनलोड करा ॲप लिंक: *http://vridhamma.org/applink.html*

**सूचनाः** कृपया लक्षात घ्या की या ॲप मध्ये कोणत्याही भाषेतील पत्रिका/ *Newsletters* वाचू शकता आणि तिला डाऊनलोड करून तिची प्रिंट पण काढू शकता.

### दोहे धर्माचे

केस डोक्याचे कापले, काढे दाढी मिशी।
भिक्षापात्र घेऊनी, घाली वस्त्रे साधुची॥
निघे सोडुनी राज्यसुख, भिक्षुक बनला नरेश।
जोड़े अन् शीरछत्राला, त्यागतो च दरवेश॥
विना मागितल्या जे मिळे, त्यात करी संतोष।
शिळे-कोरडे खाऊनी, करी देहाचा पोष॥
मार्ग काट्याकुट्यांचा, चाले रे अनवाणी।
पायांना फोड, जखमा, त्यात पू अन् पाणी॥
कष्ट ना बाधक बनती, थांबवे ना थकवा।
मनात एकची ध्यास रे, भेटू दे च भगवा॥
भेटे च बुद्ध भगवान, मिळे धर्माचे ज्ञान।
निर्मळ मिळे विपश्यना, मिळे मोक्ष निर्वाण॥

### दोहे धर्माचे

पुत्र, पत्नी अन् परिजन, पूर्ण रे परिवार।
असंग होई, त्याग करी, जसा त्यागी अंगार॥
दास-दासींनी भरला, त्यागी राज महाल।
निघे सत्याच्या शोधात, नरपुंगव रे लाल॥
कधी रे सुवर्ण थाळीत, षड्रस व्यंजन भोग।
कधी रे भिक्षा पात्रात, उष्टे मिळे संयोग॥
हाथी घोडा पालखी, सुखद जोडले यान।
कोठे पायी चालणे, कंटक-पथ अभियान॥
पाय घावांनी भरले, हास्य रे सुटेना।
असा ध्यास लागे मनी, थकवा जाणवेना॥
चाले रे दुर्गम च पथ, भरी हृदयी मोद।
एका च संबुध्दाकडून, मिळे धर्माचा बोध॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादकः राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनी: (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2568, श्रावण पौर्णिमा, 19 ऑगस्ट, 2024 वर्ष 8 अंक 5

वार्षिक शुल्क रु. 100/-, US $ 50, (भारताबाहेर पाठविण्यासाठी) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK/RNP 286/2024-2026

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) **(किरकोळ विक्री होत नाही)**
**DATE OF PRINTING: 04 August 2024, DATE OF PUBLICATION: 19 August, 2024**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
फोन : (02553) 244998, 243553, 244076, 244086, 244144, 244440
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org